सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, ऑक्टोबर २७, २००६/कार्तिक ५, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**-मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . **३५०-३५४**

## नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ ऑक्टोबर २००६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2006.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;



[ **किंमत** : रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ब मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :— १८८८ चा मुंबई ३.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र जिला मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा. **३.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ५ब मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :— १९४९ चा मुंबई ५९.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल

परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र जिला मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,---

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल. ".

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

सन् १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ९अअ ची सुधारणा.

**४.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ९अअ मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र जिला मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्यांबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल. " .

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९अ मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :---

" परंतु, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र जिला मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल." .

## निवेदन.

महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २००६ (२००६ चा महा. ३५) द्वारे, राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेली व्यक्ती, नामनिर्देशनपत्र भरताना, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील अशी तरतूद करण्यासाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

२. पडताळणी समित्यांकडे मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्यामुळे राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या अनेक व्यक्तींना, नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी पडताळणी समित्यांकडून देण्यात येणारे वैधता प्रमाणपत्र मिळणार नाही आणि परिणामी, ते त्यांच्या निवडणूक लढविण्याच्या हक्कापासून वंचित राहतील अशा आशयाची अनेक अभिवेदने शासनाला लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाली आहेत. म्हणून, पडताळणी समितीकडे वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेल्या परंतु वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशा व्यक्तीला, नामनिर्देशनपत्र भरताना, पडताळणी समितीकडे तिने केलेल्या अर्जाची सत्य प्रत सादर करील आणि ती निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र देईल या शर्तीवर राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणे शक्य व्हावे म्हणून उपरोक्त अधिनियमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. तसेच तिने दिलेल्या हमीपत्रानुसार, तिने तीन महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती परिषद सदस्य किंवा पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल अशी देखील तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २७ ऑक्टोबर २००६.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. ज. मो. फाटक,**
शासनाचे प्रधान सचिव.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई